# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. मनपा/आयुक्त/ ०६ /२०२२-२३
मा. आयुक्तांचे कार्यालय
दि.१० /०४/२०२३

## कार्यालयीन आदेश

**विषय**:- राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये शहर सौंदर्यीकरण अभियान राबविण्याबाबत.

संदर्भ :- महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन परिपत्रक क्र.संकिर्ण-२०२२/ प्र.क्र.२२५/नवि-२०, दि.२८ जुलै, २०२२.

संदर्भिय शासन परिपत्रक सोबत जोडले आहे, कृ. अवलोकन व्हावे.

राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये शहर सौंदर्यीकरण अभियान यशस्वीपणे राबविणेसाठी शासनाकडून संदर्भिय परिपत्रकान्वये मार्गदर्शक सूचना, अभियान राबविण्यासाठी अनुसरावयाची पध्दती आणि अभियान राबविताना विचारात घ्यावयाच्या बाबी विहित केलेल्या आहेत. त्यातील बहुतांश बाबी ह्या बांधकाम विभागाशी निगडीत आहेत. तसेच शहरवासीयांना सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने शहरातील विविध विकास कामे व सुशोभिकरणाची कामे ही बांधकाम विभागामार्फत करण्यात येतात.

करीता शहर सौंदर्यीकरण अंतर्गत होणारी कामे ही शहर अभियंता यांचे देखरेखी व नियंत्रणाखाली होतील, याकामी आपणांस प्राधिकृत करण्यात येत आहे. शहर सौंदर्यीकरण अभियान राबविताना आपण शासन परिपत्रकातील मार्गदर्शक सूचना व अनुसरावयाची पध्दती यांचे तंतोतंत पालन करावे. अभियाना अंतर्गत राबवावयाच्या कामांचे नियोजन करुन वेळोवेळी केलेल्या कामांचा अहवाल अतिरिक्त आयुक्त (१) यांचे मार्फत आयुक्तांना सादर करावा.

तसेच या अभियानांतर्गत शासनाकडून वेळोवेळी होणाऱ्या स्पर्धा, Reforms इ. मध्ये सहभाग नोंदविण्यासाठी फॉर्मस् भरणे आणि वेळोवेळी मागविण्यात आलेली माहिती शासनास सादर करण्याची जबाबदारी आपली राहील.

**(दिलीप ढोले)**
आयुक्त तथा प्रशासक
मिरा भाईंदर महानगरपालिका

**प्रति,**
**शहर अभियंता**
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत:- माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.

१. अतिरिक्त आयुक्त (सर्व)
२. उपायुक्त (सर्व)
३. विभागप्रमुख / खातेप्रमुख (सर्व)